निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र

# आत्ताच एक्सप्रेस

छत्रपती संभाजीनगर
पाने : ४
किंमत : २.००
वर्ष : १५ वे
अंक : ८० वा
रविवार -२५ मे २०२५

E-mail:dainikattachexpress@gmail.com | E-Paper : http://attachexpress.in | Post Regd.No. ABD-441/2024-26 | RNI.No.MAH/MAR2011/39247




# ‘विकसित भारत-२०४७’ लक्ष्य साधण्यासाठी महाराष्ट्र ‘विकास आणि विरासतचे व्हीजन’ घेऊन सज्ज - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## निती आयोगाची नवी दिल्लीत बैठक

**आत्ताच एक्सप्रेस**

**नवी दिल्ली/प्रतिनिधी/** विकसित भारत-२०४७ चे लक्ष्य गाठण्यासाठी केंद्र सरकार आणि सर्व राज्यांच्या सोबत महाराष्ट्र ‘विकास आणि विरासतचे व्हीजन’ साकार करण्यासाठी संपूर्ण क्षमतेने सज्ज असेल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे सांगितले. तसेच महाराष्ट्रात २०३० पर्यंत राज्यासाठी आवश्यक ५२ टक्के ऊर्जा ही हरित स्त्रोतांतून निर्माण केली जाईल अशी ग्वाही देखील मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी दिली. निती आयोगाच्यावतीने आयोजित बैठकीत ते बोलत होते.मुख्यमंत्री फडणवीस यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या महाराष्ट्राच्या विविध संकल्प, प्रकल्प आणि योजनांना मिळत असलेल्या पाठबळाचा आवर्जून उल्लेख केला. त्यासाठी व केंद्र सरकारच्या विविध विभागांचे सहकार्यासाठी आभार मानले. सुरवातीलाच मुख्यमंत्री फडणवीस यांनी भारतीय सैन्य दल आणि भारताचे पोलादी नेतृत्व पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे ‘ऑपरेशन सिंदूर’ बद्दल हृदयपूर्वक आभार मानले तसेच अभिनंदन केले.

बैठकीत मुख्यमंत्री फडणवीस यांनी महाराष्ट्राची भविष्यातील वाटचाल स्पष्ट केली. ते म्हणाले की, राज्यात ४५,५०० मे.वॅ. अतिरिक्त ऊर्जा खरेदीचे करार करण्यात आले आहेत. यातील ३६००० मे. वॅ. ही हरित ऊर्जा आहे. २०३० पर्यंत राज्यातील ५२ टक्के ऊर्जा ही हरित स्त्रोतांतून निर्माण होईल. मुख्यमंत्री सौरकृषी वाहिनी योजना २.० च्या माध्यमातून १० हजार कृषीफिडर्सवर १६,००० मेवॅ. क्षमतेचे प्रकल्प सुरु करण्यात आले असून, त्यातील १४०० मेवॅ.चे प्रकल्प कार्यान्वित झाले आहेत. डिसेंबर २०२६ पर्यंत राज्यातील शेतकऱ्यांना शंभर टक्के वीज दिवसा उपलब्ध होईल आणि ती सौर प्रकल्पांतून असेल. राज्यात १०० गावांत सौरग्राम योजना सुरु असून, १५ गाव संपूर्णत: सौर ऊर्जाग्राम झालेले आहे. पंप स्टोरेजसाठी नवीन धोरण आखण्यात आले असून, ज्यात ४५ पीएसपीसाठी विविध विकासकांसोबत १५ करार करण्यात आले आहेत. याची एकूण क्षमता ६२,१२५ मेवॅ इतकी असून, ३.४२ लाख कोटींची गुंतवणूक यातून होईल. ९६,१९० इतके रोजगार सुद्धा निर्माण होतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

राष्ट्रीय धोरणानुसार, महाराष्ट्र सरकार सुद्धा महाराष्ट्र २०४७ असे व्हीजन तीन टप्प्यात तयार करीत असल्याचे नमूद करून मुख्यमंत्री श्री फडणवीस म्हणाले की, १०० दिवसांच्या सुशासन, नागरिक केंद्रीत उपाययोजना आणि उत्तरदायित्त्व अशा सूत्रावर एक कार्यक्रम आमच्या सरकारने हाती घेतला. यात विविध विभागांनी ७०० हून अधिक उद्दिष्ट साध्य केले. आता दीडशे दिवसांचा कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे. यात २०४७ साठी दीर्घकालिन, महाराष्ट्र आपला अमृत महोत्सव साजरा करेल, त्या कालावधीचे म्हणजे २०३५ साठी आणि प्रतिवर्षाच्या उद्दिष्टांसह २०२९ साठीचे अल्पकालिक ५ वर्षांचे असे व्हीजन तयार करण्यात येत आहे. विद्यमान अर्थव्यवस्था २०३० पर्यंत १ ट्रिलियन डॉलर्स आणि २०४७ पर्यंत ५ ट्रिलियन डॉलर्सची करण्याचा मुख्य उद्देशअसल्याचेही त्यांनी सांगितले.

महाराष्ट्राचे भारताचे गुंतवणूक मॅग्नेट असल्याचे स्पष्ट करून मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, २०२४-२५ या पहिल्या तिमाहीत देशात सर्वाधिक १.३९ लाख कोटींची परकीय गुंतवणूक आकर्षित केली. दावोस वर्ल्ड इकॉनॉमिक फोरममध्ये १५.९६ लाख कोटींचे सामंजस्य करार केले. त्यातील ५० टक्के प्रस्तावांवर प्रक्रिया सुरु झाली असून, त्यातील अधिकाधिक गुंतवणूक ही दुसऱ्या आणि तिसऱ्या श्रेणीतील शहरांमध्ये होत आहे. नीती आयोगाच्या मार्गदर्शनात एमएमआर क्षेत्राला ग्रोथहब म्हणून आम्ही विकसित करीत असून, ज्यातून २०४७ पर्यंत या क्षेत्राला १.५ ट्रिलियन डॉलर्सची अर्थव्यवस्था करणे हा उद्देश साध्य करायचा आहे. यासाठी केंद्र सरकारकडून विशेष वित्तीय मदत व्हावी, अशी अपेक्षा व्यक्त करून मुख्यमंत्री श्री फडणवीस यांनी टीयर-२ आणि टीयर-३ शहरांमध्ये औद्योगिक विकासाला चालना देण्याच्या प्रयत्नांतून आता गडचिरोली ही स्टील सिटी, नागपूर हे संरक्षण हब, अमरावतीत टेक्सटाईल क्लस्टर, छत्रपती संभाजीनगर हे ईव्ही उत्पादन, ऑरिक सिटी तर रायगड जिल्ह्यातील दिघी येथे स्मार्ट इंडस्ट्रीयल सिटीचे निर्माण होत आहे, अशी माहितीही दिली.एमएसएमई’ क्षेत्रात महाराष्ट्र अव्वल असल्याचे सांगून मुख्यमंत्री म्हणाले की, महाराष्ट्राचे ६० लाखांहून अधिक एमएसएमई उद्यम पोर्टलवर नोंदणीकृत आहे. हे देशात सर्वाधिक आहे. यासाठी ईज ऑफ डुईंग बिझनेस, मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम इत्यादीतून २ लाख उद्यमींना संधी प्राप्त झाल्या आहेत. अलीकडेच मुंबईत वेव्हज परिषदेच्या माध्यमातून दोन वैश्विक स्टुडियोंसाठी ५००० कोटींचे सामंजस्य करार झाले, मुंबईत आयआयसीटीची स्थापना, एनएसईत वेव्हज इंडेक्सचा शुभारंभ तसेच युनिव्हर्सिटी ऑफ यॉर्क आणि युनिव्हर्सिटी ऑफ वेस्टर्न ऑस्ट्रेलिया यांच्याशी करार झाल्याचेही त्यांनी सांगितले.नाशिक सिंहस्थ कुंभमेळा २०२७ मध्ये असून, त्यासाठी केंद्राचे मार्गदर्शन आणि आर्थिक मदत महाराष्ट्राला मिळेलच, असा विश्वास देखील मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी या बैठकीत व्यक्त केला.

## आत्ताच एक्सप्रेस च्या बातमीचा दणका,झोपलेले प्रशासन तात्काळ जागे


उदय कुलकर्णी निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र

आत्ताच एक्सप्रेस

छत्रपती संभाजीनगर
पाने : ४
किंमत : २.००
वर्ष : १५ वे
अंक : ७६ वा
बुधवार -२१ मे २०२५

E-mail:dainikattachexpress@gmail.com | E-Paper : http://attachexpress.in | Post Regd.No. ABD-441/2024-26 | RNI.No.MAH/MAR2011/39247

भोंगळ कारभारामुळे ऐन पावसाळ्याच्या तोंडावरच संपूर्ण शहर वासियांच्या आरोग्यास मोठा धोका

आत्ताच एक्सप्रेस

कन्नड प्रतिनिधी/ उदय कुलकर्णी/ कन्नड परिषदेच्या चालतेल्या भोंगळ कारभारामुळे ऐन पावसाळ्याच्या तोंडावरच संपूर्ण शहर वासियांच्या आरोग्यास मोठा धोका निर्माण झाला आहे.

गेल्या अनेक दिवसापासून कन्नड न.परिषदेची सूत्रे कन्नडचे उपविभागीय अधिकारी संतोष ...

**आत्ताच एक्सप्रेस**

**कन्नड/उदय कुलकर्णी/** न.प.चे भोंगळ कारभाराच्या मथळ्याखाली प्रसिद्ध झालेल्या बातमीचा धसका घेऊन कन्नड शहरा-तील डबघाईस आलेल्या रस्त्याकडे संबंधित प्रशासनाचे दुर्लक्ष असे प्रशिद्ध करताच झोपी गेलेल्या प्रशासन अधिकाऱ्यास गडबडून जाग आली आहे.व शहरातील प्रमुख रस्त्याच्या कामास सुरवातही झाली आहे.

दि.२३ रोजी दैनिक आत्ताच एक्सप्रेस ने प्रसिद्ध केलेल्या बातमीत शहरातील प्रमुख रस्त्याची लागलेली वाट व त्याकडे प्रशासनाचे दुर्लक्ष बाबद बातमी प्रसिद्ध करण्यात आली होती. त्या बातमीचा धसका घेऊन झोपी गेलेल्या प्रशासनास तात्काळ जाग आली असुन शहरातील प्रमुख असलेल्या तहसील कार्यालया समोरील रस्त्याच्या कामास प्रत्यक्ष सुरवात झालेली आहे.आता तेच बगावे लागेल की,सदर काम व इतर कामे मान्सूनपूर्व होतात का? ती झाल्यास नागरिकांचा जीव भांड्यात पडेल.

## आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या वारसांना मदतीसाठी २० कोटींचा निधी - मंत्री मकरंद जाधव-पाटील

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/ प्रतिनिधी/** शेतकरी आत्महत्या प्रकरणातील मृत शेतकऱ्याच्या संबंधित वारसाला वेळीच मदत मिळावी यासाठी राज्य शासनाकडून २० कोटीचा निधी सर्व विभागीय आयुक्तांना उपलब्ध करून दिला आहे. याबाबतचा शासन निर्णय नुकताच जारी करण्यात आला असल्याची माहिती मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव पाटील यांनी दिली.

मदत व पुनर्वसन मंत्री जाधव-पाटील यांनी सांगितले, राज्यामध्ये नापिकी, कर्जबाजारीपणा व कर्ज परतफेरीचा तगादा या तीन कारणामुळे आत्महत्या केलेल्या शेतकऱ्याच्या वारसा-ला मदत दिली जाते. महसूल, कृषी, गृह आणि सहकार विभागामार्फत तपासणी करून ही मदत दिली जाते. आत्महत्या केलेल्या शेतकऱ्याच्या वारसाला मदत करण्यासाठी विभागीय आयुक्त तथा नियंत्रक अधिकारी, कोकण यांना १२ लाख, पुणे- एक कोटी सहा लाख, नाशिक- तीन कोटी ३९ लाख, छत्रपती संभाजीनगर- चार कोटी ९२ लाख, अमरावती- सहा कोटी ७६ लाख आणि नागपूर विभागीय आयुक्त यांना तीन कोटी ७५ लाखाचा निधी उपलब्ध करून दिला आहे. राज्य शासनाने उपलब्ध करून दिलेला हा २० कोटींचा निधी मुंबई शहर व मुंबई उपनगर हे दोन जिल्हे वगळता राज्यातील उर्वरीत जिल्हाधिकाऱ्यांना विभागीय आयुक्तांमार्फत वितरीत करण्यात येणार आहे.

उणे प्राधिकार पत्रावर निधी आहरीत करण्यास मान्यता

आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याच्या वारसास तातडीने मदत देण्यासाठी सन २०२५-२०२६



या आर्थिक वर्षात उणे प्राधिकार पत्रावर निधी आहरीत करण्यासही मान्यता देण्यात आली आहे. यामुळे निधी अभावी आणि निधी मागणी प्रस्ताव पाठवून त्यास शासनाची मंजुरी घेणे या कारणास्तव मदत देण्यासाठी होणारा विलंब टाळला जाणार असल्याचेही मदत व पुनर्वसन मंत्री जाधव-पाटील यांनी सांगितले.

## सत्यजित तांबे काँग्रेसवर जोरदार हल्लाबोल करत म्हणाले, ’फडणवीस साहेब..’

**आत्ताच एक्सप्रेस**

**अहिल्यानगर/प्रतिनिधी** / माझा भाजप पक्ष प्रवेशाचा अजून काही विषय नाही. देवेंद्र फडणवीस साहेब आहेत. जे लोक मला मार्गदर्शन करतात ते सांगतील मला कधी काय करायंच ते... सध्या अपक्ष आहे आणि अपक्षचं चांगलं आहे, असं सूचक वक्तव्य विधानपरिषदेचे आमदार सत्यजित तांबे यांनी केलंय. ते एका मुल-ाखतीत बोलत होते. यावेळी सत्यजित तांबे यांनी काँग्रेसवर सडकून टीका केली आहे. सत्यजित तांबे म्हणाले, काँग्रेसची मला चिंता वाटते. ही चिंता प्रेमामुळे सुद्धा वाटते. माझे शेवटी त्या पक्षावर प्रेम आहे. कारण त्या विचारातून आम्ही लहानाचे मोठे झालो आहोत. मात्र, जेव्हा आम्ही पाहातो की, तेथे काहीच होत नाही. कोणीच सिरीयस नाहीये. देशाच्या विरोधात भूमिका घेण्याचं काम सुरु आहे. देश एका बाजूला चाललाय. तुम्ही काहीतरी वेगळंच करताय. हे कुठंतरी मनाला खटकतं. राजकारण म्हणून सुद्धा तुमचं धोरण नेमकं काय? शशी थरुर यांना अमेरिकेत बाजू मांडण्यासाठी पाठवण्यात आलं. काँग्रेसने लगेच पंतप्रधानांना पत्र लिहिलंय की, काँग्रेसमधून कोण पाठवायचं हे तुम्ही ठरवणार का? आम्ही आमचे नावं देणार... हे त्यांचेच नावं देणार जे त्यांचे आजूबाजूचे लोक आहेत. हे त्यांचेच नाव देणार जे त्यांचं लांगुणचालन करतात. ते शशी थरुर यांना संधी देणार नाहीत. चांगले लोक आ-हेत, ज्यांचे विचार चांगले आ-हेत, त्यांचा दिल्लीतील काँग्रेसची चांडाळचौकडी द्वेष करते. त्यांचा तिरस्कार करते. मला वाटतं की, सगळ्यात चुकीची गोष्ट आहे.मला असं वाटतं की, आत्मविश्वास थोडा जास्त झाला. आमचा पराभव कधी होऊच शकत नाही, असा आम्हाला सगळ्यांना ओव्हर कॉन्फिडन्स होता.

अनेक राजकीय कारणं आ-हेत. संगमनेर शहरात चुकीच्या मार्गांनी प्रपोगंडा झाला. हिंदू-मुस्लिमांमध्ये भांडण लावण्यात आलं. आम्ही मुस्लिम धार्जिणे आहोत, थोरात साहेब मुस्लिम धार्जिणे आहेत, अशा प्रकारची प्रतिमा तयार करण्यात आली. लाडकी बहीणसारखी योजना आली होती, त्याचा परिणाम झाला.



## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतली देशाचे नवे सरन्यायाधीश भूषण गवई यांची सदिच्छा भेट

**आत्ताच एक्सप्रेस**

**नवी दिल्ली/प्रतिनिधी/** देशाचे नूतन सरन्यायाधीश मा. न्या. भूषण रामकृष्ण गवई यांची नवी दिल्ली येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज सदिच्छा भेट घेतली. या भेटीत फडणवीस यांनी सरन्यायाधीश गवई यांचे हार्दिक अभिनंदन करून त्यांना शुभेच्छा दिल्या.

महाराष्ट्राला पुन्हा एकदा सरन्यायाधीशपदाचा मान मिळाल्याचा अभिमान असल्याचे त्यांनी नमूद केले. या भेटीदरम्यान, फडणवीस यांनी न्या. गवई यांना महाराष्ट्र विधानमंडळात सर्वपक्षीय सत्कार समारंभासाठी तसेच भारतीय संविधान या विषयावर मार्गदर्शन करण्यासाठी व्याख्यान देण्याचे आग्रहाचे निमंत्रण दिले.

# गोल्डन बॉयचे स्वप्न साकार....

९० मीटर भाला फेकण्याचे भारताचा गोल्डन बॉय ऑलिम्पिक सुवर्णपदक विजेता भालाफेकपटू नीरज चोप्राचे स्वप्न साकार झाले आहे. नीरज चोप्राने दोहा डायमंड लीगमध्ये ही अभिमानास्पद कामगिरी केली आहे. दोहा डायमंड लीगमध्ये तिसऱ्या प्रयत्नात ९०.२३ मीटर भाला फेकत नीरजने स्वप्न साकार केले आहे. ९० मीटर भाला फेकून त्याने स्वतःचाच राष्ट्रीय विक्रमही मोडला आहे. त्याची ही कामगिरी ऐतिहासिक अशीच आहे कारण ९० मीटर भाला फेकणारा तो भारताचा पहिलाच भालाफेक पटू ठरला असून अशी कामगिरी करणारा तो जगातील केवळ दुसरा भालाफेकपटू आहे. ९० मीटर भालाफेकणे हे कोणत्याही भालाफेकपटूचे स्वप्न असते तसे ते निरजचेही होते. आपल्या कारकीर्दीत ९० मीटर फेकण्याचे स्वप्न नीरज ने पाहिले आणि त्याने ते साकार केले आणि ते सत्यात उतरवले याबद्दल नीरजचे मनापासून अभिनंदन! याआधी त्याने अनेकदा प्रयत्न केला पण त्याला ९० मीटर भाला फेकत आला नव्हता मागील वर्षीच त्याने लॉसने डायमंड लीगमध्ये पहिलं स्थान पटकावलं होतं. त्यात त्याने ८७.६६ मीटर अंतरावर भालाफेकला होता. त्याचा या ऐतिहासिक कामगिरीने देशातील १४४ कोटी जनतेची मान उंचावली आहे अर्थात अशी ऐतिहासिक कामगिरी करण्याची त्याची ही पहिली वेळ नाही याआधी तीन वर्षांपूर्वी नीरज चोप्राने टोकियो ऑलिंपिकमध्ये विक्रमी भालाफेक करून सुवर्णपदक जिंकून इतिहास घडवला होता. विशेष म्हणजे ऍथलॅटीक्समध्ये भारताला मिळालेले हे पहिलेच पदक होते. याआधी मिल्खा सिंग, पी टी उषा हे पदकाच्या जवळ पोहचूनही पदकाला गवसणी घालू शकले नव्हते ती किमया नीरजने करून दाखवली होती. भारतासाठी ऑलिम्पिकमध्ये सुवर्णपदक आणि दोनदा डायमंड लीग स्पर्धा जिंकणाऱ्या नीरज चोप्राचा जन्म २७ डिसेंबर १९९७ ला हरियाणातील पानिपत जिल्ह्यातील खांद्रा या छोट्याशा गावात एका सर्वसामान्य शेतकरी कुटुंबात झाला. त्याचे शिक्षण चंदीगड येथे झाले.

लहानपणापासून त्याला खेळाची आवड होती. त्याचे वजन ८० किलो होते त्यामुळे गावातील लोक त्याला सरपंच म्हणत. कुस्ती, कबड्डी असे खेळ त्या गावातील मुले खेळत पण नीरजने मात्र भालाफेक या खेळाची निवड केली. विशेष म्हणजे त्याच्या गावात कोणीही भालाफेक हा खेळ खेळत नव्हते. भाला फेक हा खेळ जागतिक स्तरावर खेळला जातो हे देखील त्या गावातील काही लोकांना माहीत नव्हते त्यामुळे अनेकांनी त्याला भालाफेक सोडून कुस्ती हा खेळ खेळण्यास सांगितले. नीरजने मात्र त्याकडे दुर्लक्ष करून भालाफेकीतच करियर करायचे आणि देशाचे नाव उज्ज्वल करायचे असा निश्चय केला. त्यासाठी त्याने तंदुरुस्तीवर भर दिला. खूप प्रयत्न करून स्वतःचे वजन कमी केले. भालाफेकीचा दररोज सराव केला. खेळात सातत्य ठेवले आणि दिवसेंदिवस चांगली कामगिरी केली. राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत चांगली कामगीरी केल्याने २०१६ साली दिल्लीत झालेल्या आशिआई स्पर्धेत भारतीय पथकात त्याची निवड झाली. आपल्या या पहिल्याच आंतरराष्ट्रीय स्पर्धेत त्याने भारताला सुवर्णपदक मिळवून दिले. त्यानंतर २०१६ मध्येच पोलंडमध्ये झालेल्या २० वर्षाखालील वर्ल्ड चॅम्पियनशिपमध्ये ८४. ४८ मीटर दूर भाला फेकून सुवर्णपदक मिळवले. अंजु बॉबी जॉर्ज नंतर आंतरराष्ट्रीय स्पर्धेत एथलॅटीक्समध्ये भारताला पदक मिळवून देणारा नीरज हा दुसराच भारतीय खेळाडू ठरला होता. एकाच वर्षात दोन महत्वाच्या स्पर्धेत सुवर्णपदक जिंकल्याने त्याचे जगभर नाव झाले. या कामगिरीनंतर नीरजची भारतीय सेनेत ज्युनियर कंडिशन ऑफिसर म्हणून नेमणूक करण्यात आली. २०१८ साली जकार्ता येथे झालेल्या एशियन गेम्समध्ये त्याने ८८.०७ मीटर भाला फेकून राष्ट्रीय विक्रमासह सुवर्णपदक जिंकले. सतत चांगली कामगिरी करणाऱ्या नीरजला २०१९ मध्ये मात्र दुखापतीने घेरले. त्याच्या खांद्यावर शस्त्रक्रिया करावी लागली त्यामुळे त्याला काही महिने खेळापासून दूर राहावे लागले. २०२० साली जगभर कोरोनाचा प्रादुर्भाव वाढला त्यामुळे त्याला सक्तीची विश्रांती घ्यावी लागली. त्यामुळे त्याच्या ऑलिम्पिक तयारीवरही मोठा परिणाम झाला असे असतानाही या ऑलिम्पिकमध्ये भारताला पदक मिळवून द्यायचेच या निश्चयाने तो मैदानात उतरला. पहिल्या प्रयत्नातच त्याने ८७.०३ मीटरवर भाला फेकून आघाडी मिळवली. दुसऱ्या प्रयत्नात नीरजने ८७.५८ मीटर भाला फेकत पहिल्या प्रयत्नाच्या तुलनेत सुधारणा केली तिसऱ्या प्रयत्नात नीरजचा भाला ७६.७९ मीटरवर गेला. त्याचा चौथा आणि पाचवा प्रयत्न मात्र अवैध ठरला. मात्र बाकी स्पर्धकांची कामगिरी सर्वसाधारण राहिली त्यामुळे नीरजची आघाडी कायम राहिली.

सहाव्या प्रयत्नात नीरजने ८४.२४ मीटर अंतरावर भाला फेकून सुवर्णपदकाला गवसणी घातली. त्याचे सुवर्णपदक निश्चित झाले की देशवासीयांनी दिवाळीच साजरी केली होती आजही तोच उत्साह देशवासीयांमध्ये आहे. ९० मीटर भाला फेकणारा भारतातील पहिला व जगातील दुसरा भालाफेकपटू ठरलेल्या निरजच्या यशाने देशातील १४४ कोटी देशवासियांची छाती अभिमानाने फुगली आहे. ९० मीटर भाला फेकण्याचे स्वप्न साकार करणाऱ्या नीरज चोप्राचे मनापासून अभिनंदन!




## कन्नडच्यामच्छि मार्केट मध्ये घाणीच्या दुर्गंधीने नागरिकांच्या आरोग्यास धोका



**आत्ताच एक्सप्रेस**

**कन्नड/ उदय कुलकर्णी**/शहरातील मच्छिं मार्केट टिळक नगर परिसरात साचलेल्या घाणींमुळे मोठी दुर्गंधी सुटून नागरिकांच्या आरोग्यास मोठा धोका निर्माण झाला आहे. आमच्या प्रतिनिधिने सदर प्रभागात फेर फटका मारला असता मोठ्या प्रमाणात साचलेल्या ओल्या कचऱ्यामुळे सदर प्रभागात मोठी दुर्गंधी सुटली असुन या दुर्गंधीमुळे डासांचे प्रमाणही मोठ्या प्रमाणात वाढून नागरीक दुर्धर आजाराने ग्रासण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे.घरातील वयोवृद्ध,लहाण बाळे यांना तर रात्र रात्र झोप लगत नसून या भयानक जीवघेण्या दुर्गंधी व त्यापासून होणाऱ्या आजारातून सुटका व्हावी म्हणून तेथील प्रभागातील नागरिकांनी आमचे प्रतिधीकडे ओरड केली आहे.व झोपलेल्या न.पा. प्रशासनास जागे करण्यासाठी विनंती केली आहे.

## निवडणूक आयोगाकडून वकील व मुख्य निवडणूक अधिकारी यांच्या राष्ट्रीय परिषदेचे आयोजन

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/ प्रतिनिधी**/ नवी दिल्ली येथील खखखऊएच् मध्ये भारताच्या निवडणूक आयोगाच्या वतीने आयोजित वकिलांच्या राष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या अध्यक्षतेखाली झाले. या वेळी निवडणूक आयुक्त डॉ. सुखबीर सिंग संधू आणि डॉ. विवेक जोशी हे देखील उपस्थित होते. या परिषदेत भारताच्या सर्वोच्च न्यायालयातील आणि देशभरातील २८ उच्च न्यायालयातील ज्येष्ठ विधिज्ञ तसेच सर्व ३६ राज्ये व केंद्रशासित प्रदेशांचे मुख्य निवडणूक अधिकारी (CEOs) आणि निवडणूक आयोगाचे वरिष्ठ अधिकारी सहभागी झाले.

या उपक्रमाचा उद्देश आयोगाच्या कायदेशीर चौकटीला उदयोन्मुख आव्हानांचा सामना करण्यासाठी अधिक प्रभावीपणे पुन्हा आकार देणे आणि समन्वय साधणे हा आहे. परिषदेच्या माध्यमातून अनावश्यक वाद टाळण्यावर आणि सर्व संबंधित पक्षांना योग्य त्या सुनावणीची संधी देण्यावर भर देण्यात आला.दिवसभर चाललेल्या या परिषदेने देशभरातील प्रख्यात कायदा तज्ज्ञ आणि आयोगातील प्रतिनिधी यांच्यात संवाद साधण्याचे महत्त्वाचे व्यासपीठ उपलब्ध करून दिले. ही परिषद भारतातील निवडणूक संबंधित न्यायप्रणालीच्या बदलत्या स्वरूपाशी आयोगाच्या कायदेशीर संसाधनांना जुळवून घेण्याच्या दृष्टीने एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरली.

यामध्ये निवडणूक कायदे, न्यायालयीन प्रक्रिया आणि कायद्यातील सुधारणांशी संबंधित मुद्द्यांवर विशेष भर देऊन आयोगाच्या कायदेशीर संघटनेची कार्यक्षमता, तयारी आणि समन्वय वाढवण्यावर चर्चा झाली. या संवादाद्वारे विविध न्यायालयीन स्तरांवरील आयोगाच्या प्रतिनिधित्वाची प्रभावीता वाढवण्याचा उद्देश होता.

शुक्रवारी, IIIDEM² नवी दिल्ली येथे आयोगाने मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांची स्वतंत्र परिषद आयोजित केली. या परिषदेचा उद्देश आयोगाच्या खढ उपक्रमांची दिशा निश्चित करणे आणि भविष्यातील योजनांची आखणी करणे हा होता. एउख ने २०२५ मध्ये एक अभिनव उपक्रम सुरू केला असून, एउखछएढ नावाचे एकात्मिक डॅशबोर्ड




विकसित करण्याचे काम सुरू केले आहे.

या डॅशबोर्डच्या माध्यमातून आयोगाच्या सर्व माहिती-संबंधित उपक्रमांना एकाच प्लॅटफॉर्मवर आणण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. संबंधित कायदेशीर अटींच्या मर्यादेत राहून सर्व भागधारकांना आवश्यक माहिती सहज उपलब्ध होईल असा हा उपक्रम असल्याचे भारत निवडणूक आयोगाने कळविले आहे.

## लोकांतील, लोकांचा लोकनेता ; विलासराव देशमुख

महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांची आज ८० वी जयंती. आजच्याच दिवशी म्हणजे २६ मे १९४५ रोजी लातूरमधील बाभळगावमध्ये त्यांचा जन्म झाला. विलासरावांनी पुण्यात बीएससी, बीए, एलएलबी यासारखे उच्च शिक्षण घेतले. शिक्षण पूर्ण झाल्यावर विलासराव आपल्या गावी बाभळगावला परतले. १९७४ साली विलासराव बाभळगाव चे सरपंच झाले. १९७५ पासून ते काँग्रेसचे क्रियाशील कार्यकर्ते बनले. १९८० साली त्यांनी पहिल्यांदा लातूर विधानसभा मतदार संघातून आमदारकीची निवडणूक लढवली आणि पहिल्याच प्रयत्नात ते आमदार म्हणून ते निवडून आले. १९८२ साली त्यांची महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळात मंत्री म्हणून निवड झाली. त्यांनी कृषी, ग्रामविकास, सहकार, शिक्षण, तंत्रशिक्षण, क्रीडा व युवक कल्याण खात्याचे राज्यमंत्री म्हणून काम पाहिले. १९८६ साली ते महसूल आणि सहकार या महत्वाच्या खात्याचे कॅबिनेट मंत्री बनले. उद्योग आणि सांस्कृतिक खात्याचे मंत्री म्हणूनही त्यांनी काम पाहिले. मंत्री म्हणून त्यांनी केलेल्या कामामुळेच ते सलग तीनदा विधानसभेत निवडून गेले मात्र १९९५ सालची विधानसभा निवडणूक त्यांना जिंकता आली नाही. १९९२- ९३ साली झालेल्या दंगली आणि बॉम्बस्फोट, काँग्रेसमधील सुंदोपसुंदी, तत्कालीन मुख्यमंत्री शरद पवार यांच्यावर झालेले आरोप, एनरॉन प्रकरण यामुळे काँग्रेसचा पराभव झाला. काँग्रेसच्या अनेक दिग्गज नेत्यांना पराभवाला सामोरे जावे लागले. त्यात विलासरावांचाही समावेश होता. विलासराव देशमुख यांना जनता दलाच्या शिवाजी कव्हेकर यांनी पराभूत केले. आपल्या गडात झालेला पराभव विलासरावांना खूप लागला. विलासराव देशमुख पडावेत यासाठी तेंव्हा काँग्रेसमध्ये असलेल्या बड्या नेत्याने प्रयत्न केल्याचे तेंव्हा बोलले जात होते. १९९५ साली राज्यात भाजप शिवसेना युतीचे सरकार आले. मनोहर जोशी मुख्यमंत्री बनले. काँग्रेसचे अनेक दिग्गज नेते विधिमंडळात नाही याची विलासरावांना खंत वाटत होती त्यामुळे काहीही करून विधिमंडळात जायचे असा चंग त्यांनी बांधला. पुढच्याच वर्षी म्हणजे १९९६ साली विधानपरिषद निवडणूक लागली मात्र काँग्रेसच्या हायकमांडने त्यांना उमेदवारी नाकारली त्यामुळे बंडखोरी करून विधान परिषदेसाठी उभे रहा असा आग्रह त्यांना त्यांच्या समर्थकांनी केला. काँग्रेसच्याही अनेक नेत्यांनी त्यांना तसा सल्ला दिला. शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी तर त्यांना थेट शिवसेनेत येण्याची ऑफर दिली मात्र सारं आयुष्य काँग्रेस संस्कृतीत गेल्याने शिवसेनेत जाणं विलासरावांना शक्य नव्हतं म्हणून ते या निवडणुकीत अपक्ष म्हणून उभे राहिले. या निवडणुकीत शिवसेनेने त्यांना मदत केली तरीही त्यांचा अवघ्या अर्ध्या मतांनी पराभव झाला. विधान परिषद निवडणुकीत प्रत्येक मताला ठराविक मूल्य असतं आणि मत मोजण्याची पद्धतही वेगळी असते. सलग दोन वर्षात दोन पराभव झाल्याने विलासरावांचे राजकारण संपले, विलासराव आता पुन्हा निवडून येऊ शकत नाही अशी टीका त्यांच्यावर होऊ लागली मात्र हार मानतील ते विलासराव कसले ? विलासरावांनी पुन्हा नव्याने सुरुवात केली. जनतेत गेले, जनतेचे प्रश्न शासन दरबारी मांडले त्याचे परिणाम लवकरच दिसले. १९९९ साली शरद पवार काँग्रेस मधून बाहेर पडले. त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची स्थापना केली. त्याच वर्षी म्हणजे १९९९ साली विधानसभेच्या निवडणुका लागल्या. या निवडणुकीत काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस एकमेकांच्या विरोधात लढले तर शिवसेना भाजपने युतीत एकत्र निवडणुका लढवल्या. एकत्र लढूनही भाजप सेना युतीला बहुमत मिळाले नाही त्या दोन्ही पक्षांना मिळून १२५ जागा मिळाल्या तर स्वतंत्र लढलेल्या काँगेसला ७५ आणि राष्ट्रवादी काँग्रेसला ५८ जागा मिळाल्या. निकाला नंतर काँग्रेस राष्ट्रवादी यांच्यात सरकार स्थापने साठी बोलणी सुरू झाली. छोट्या मोठ्या पक्षांनी देखील काँगेस आघाडीला पाठिंबा देण्याचे जाहीर केले. सर्वाधिक जागा काँग्रेसच्या निवडून आल्याने काँग्रेसचाच मुख्यमंत्री होणार हे स्पष्ट झाले. काँग्रेस कडून लातूर मतदार संघातून विलासराव देशमुख सर्वाधिक मते घेऊन जिंकून आले होते. ज्या मतदार संघात त्यांचा पराभव झाला होता त्याच मतदार संघात ते पुन्हा विक्रमी मतांनी निवडून आले होते त्यामुळे मुख्यमंत्री पदाच्या शर्यतीत ते सर्वात पुढे होते शिवाय अपक्ष म्हणून जिंकून आलेल्या आमदारांनीही विलासराव देशमुख हेच मुख्यमंत्री असावेत अशी अट ठेवल्याने काँग्रेस हायकमांडने त्यांची महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदी निवड केली. जिंकून आलेल्या सर्व आमदारांनी विलासरावांना एकमुखी पाठिंबा दिला आणि ते महाराष्ट्राचे मुख्यमंत्री बनले. सलग दोन पराभव स्वीकारून ही थेट मुख्यमंत्रीपद मिळाल्याने विलासरावांची पराभवाची सल दूर झाली. काँगेस राष्ट्रवादी काँग्रेस आघाडी सरकारचे मुख्यमंत्री म्हणून त्यांनी अतिशय चांगले काम केले पण २००३ साली त्यांना राजीनामा द्यावा लागला मात्र अवघ्या वर्षभरात म्हणजे २००४ साली त्यांची मुख्यमंत्री म्हणून त्यांची निवड झाली २००४ साली झालेल्या विधानसभा निवडणुकीत जिंकून आलेल्या काँग्रेसच्या सर्व आमदारांनी विलासराव देशमुख हेच मुख्यमंत्री हवेत अशी मागणी केल्याने त्यांचीच पुन्हा मुख्यमंत्री म्हणून निवड करण्यात आली. २००४ साली विलासराव दुसऱ्यांना मुख्यमंत्री बनले. मुख्यमंत्री पदाच्या दुसऱ्या कार्यकाळातही त्यांनी चांगले काम केले मात्र २६ नोव्हेंबर २००८ रोजी मुंबईवर दहशतवादी हल्ला झाला आणि त्यांचे मुख्यमंत्रीपद गेले मात्र अल्पावधीतच त्यांची केंद्रात कॅबिनेट मंत्री म्हणून नियुक्ती करण्यात आली. मनमोहन सिंग यांच्या मंत्रिमंडळात ते कॅबिनेट मंत्री बनले. १४ ऑगस्ट २०१२ रोजी विलासरावांचे आकस्मिक निधन झाले. त्यांच्या निधनाने संपूर्ण महाराष्ट्र हळहळला. त्यांचे आकस्मिक निधून महाराष्ट्रातील जनतेला धक्का देऊन गेले. त्यांच्या निधनाने संपूर्ण महाराष्ट्र शोक सागरात बुडाला. विलासराव देशमुखांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

**- श्याम ठाणेदार,दौंड जिल्हा पुणे**

## गोहत्या केल्यास मकोका लावणार हा कायदा जनतेसाठी राहणार का?

### सरेआम मटनाची निर्यात करणाऱ्या बीफ कंपन्याला पण लागू राहणार

**आत्ताच एक्सप्रेस**

**बीड/प्रतिनिधि**/काही दिवसापूर्वी महाराष्ट्र शासनाने मंत्रीमंडळाच्या बैठकीत निर्णय घेतला की गोहत्या करणाऱ्यावर मकोका लावणार परंतु हा कायदा फक्त जनतेसाठी आहे का भाजपाचे व्यापारीमित्र बीफ कंपन्यांना पण लागू राहणार हे शासनाने जाहिर करावे अशी मागणी लोक सेना संघटना प्रमुख ड. प्रा. इलियास इनामदार यांनी महाराष्ट्रातील तमाम जनतेच्या वतीने केली आहे. या कायदयाद्वारे गोहत्या थांबवायची असेल तर फक्त गरीब खाटकावर कार्यवाही करून कसे चालणार, गाई बैल विकणाऱ्या व्यापाऱ्यांवर पण कार्यवाही व्हायला पाहिजे गाई बैल पकडून देणारे व नंतर मांडवली करून हफते खाणाऱ्या डुपलीकेट गोरक्षकांवर पण मकोका लावायला हवे, छावन्या मधून जनावरे गायब करून विकणाऱ्यावर किंवा छावन्याध्ये गाईंचे हाल हाल करून उपाशी पोटी मारणाऱ्यांवर पण मकोका लावावा व राज्यात नव्हे संपूर्ण देशात गोहत्या करून



विदेशात मटन निर्यात करणाऱ्या बीफ कंपन्यांवर पण सुद्धा मकोका लावून कायदेशीर कार्यवाही करावी. का देशात व राज्यात असे कायदे करून भाजपाचा फक्त हिंदू मुस्लिमांमध्ये तेढ निर्माण करन्याचा डाव तर नाही ना?

हिंदू धर्मामध्ये गाईला पवित्र मानले जाते गाई हिंदू बांधवांच्या आस्थेचा प्रश्न आहे राज्य शासनाने राज्यात नव्हे केंद्र शासनाने देशामध्ये गोहत्या बंदी कायदा करावा व गाईला राष्ट्रीय पशु घोषित करावे जेणे करून कोणी गोहत्या करू शकणार नाही अशी मागणी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना लोक सेना संघटनेने ऑक्टोबर २०२४ ला व मार्च २०२५ ला निवेदनाद्वारे मागणी केली होती परंतु आज तारखेपर्यंत पंतप्रधान नरेंद्र मोदी साहेबांनी याविषयी कसलीच हालचाल केलेली दिसत नाही. गोरगरीबांसाठी कायदे करणाऱ्या भाजपा सरकार चा हेतू फक्त देशात हिंदू मुस्लिम वाद निर्माण करन्याचा दिसत आहे बाकी काहीही नाही.

लोक सेना संघटना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना या विषयी पुन्हा निवेदन पाठवणार आहे अशी माहिती लोक सेना संघटना प्रमुख ड. प्रा. इलियास इनामदार यांनी प्रसार माध्यमांना दिली आहे.

# लासुर स्टेशनच्या प्राथमिक आरोग्य केंद्राच्या नवीन बांधकामाची जिल्हा परिषद अभियंता पाहणी करताना



**आत्ताच एक्सप्रेस**

**गंगापूर/प्रतिनिधी**/गंगापूर तालुक्यातील लासुर स्टेशन येथील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या नवीन बांधकामाची पाहणी करण्यासाठी जिल्हा परिषद अभियंता लासुर स्टेशन येथे आले त्यांना कामामध्ये तफावत असल्याचं निदर्शनात आले.

दरम्यान इमारत तब्बल सहा कोटी रुपये खर्चून नवीन इमारत उभी राहत आहे मात्र बांधकामाचा सुमार दर्जा असल्याच्या बातम्या दैनिक आत्ताच एक्सप्रेस ने प्रकाशीत केल्या होत्या तर काही कामात जुने स्टील वापरत असल्याचीही बातमी प्रकाशित करण्यात आल्या होत्या त्यामुळे जिल्हा परिषद बांधकाम विभाग खडबडून जागी झाला.

ठेकेदाराला झापल्याने जुने स्टील ज्या बांधकामला वापरले जात होते ते बांधकाम तात्काळ थांबवून ठेकेदाराने पुन्हा नवीन स्टील वापरून कॉलम उभे केले मात्र या बातमीने जिल्हा परिषदचे वरिष्ठ अभियंता सातपुते, अभियंता साहेबराव पाटील, अभियंता ठाकूर आदींसह रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे जिल्हा उपाध्यक्ष तान्हाजी बनसोडे, व पत्रकार यांनी शुक्रवारी लासूर स्टेशन येथील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या नवीन इमारतीच्या बांधकामाला भेट देऊन पाहणी केली व बांधकामाच्या सुमार दर्जाबाबत नाराजी व्यक्त करून मंगळवारपर्यन काम बंद ठेवण्याचे तोंडी आदेश ठेकेदाराच्या सुपरवायझरला दिले..

**बांधकामाच्या सुमार दर्जामुळे मंगळवार पर्यंत काम बंद ठेवण्याचे ठेकेदाराला तोंडी आदेश**

आ. प्रशांत बंब यांच्या प्रयत्नाने आरोग्य केंद्राच्या इमारतीसाठी तब्बल सहा कोटी रुपयाचा निधी मंजूर झाला याबाबत आ.बंब यांचे आभार मात्र संबंधित ठेकेदार बांधकाम निकृष्ठ करत असल्याच्या बातम्या नागरिकांच्यावतीने विविध दैनिकात प्रकाशित केल्या यामुळे जिल्हा परिषदच्या अभियंत्या व पत्रकारांच्या पथकांनी पाहणी केली बांधम सुमार दर्जाचे होत असल्याने अभियांत्यांनी मंगळवरपर्यंत काम बंद ठेवण्याचे तोंडी आदेश दिले असून मंगळवरनंतर पत्रकार व अभियंता हे अंदाजपत्रकानुसार काम चालू आहे की नाही हे तपासून काम पुन्हा सुरुवात होणार आहे मात्र तरीही बांधकामच्या दर्जात सुधारणा झाली नाही तर रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियतर्फे लोकशाही मार्गाने आंदोलन छेडण्यात येइल कारण पुन्हा एवढा निधी यां कामासाठी येणार नाही...

**( रिपब्लिक पार्टी ऑफ इंडिया जिल्हा उपाध्यक्ष तानाजी बनसोडे )**

मंगळवारी पत्रकार व अभियंता अंदाजपत्रकानुसार काम चालू आहे की नाही तपासणार व बांधकामाला पुन्हा सुरुवात होणार..दरम्यान प्राथमिक आरोग्य केंद्राच्या सुमार बांधकामाबाबत पत्रकारांनी जिल्हा परिषदच्या अधिकाऱ्यांना जाब विचारला असता मंगळवार पर्यंत काम बंद ठेवण्याची तोंडी आदेश ठेकेदाराला दिले असून अंदाजपत्रकानुसार बांधकाम चालू आहे की नाही हे पत्रकार व अभियंता यांच्या संयुक्त पाहणी नंतरच काम पुढे चालू करणार असल्याचे जिल्हा परिषदेच्या अभियंत्यांनी पत्रकारांना सांगितले.

# शिवराज्याभिषेकाचा अपमान करण्याऱ्या भिडेंचा शंकर चव्हाण यांच्याकडून तीव्र निषेध

**आत्ताच एक्सप्रेस**

**रायगड/ प्रतिनिधी/** छत्रपती शिवाजी महाराजांचा 'राज्याभिषेक दिन' म्हणजे ६ जून रोजी साजरा होणारा शिवराज्याभिषेक सोहळा हा महाराष्ट्राच्या अस्मितेचा आणि हिंदवी स्वराज्याच्या गौरवशाली इतिहासाचा प्रतीक आहे. मात्र, या वर्षीही या सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर वाद निर्माण झाला आहे. यावेळी 'शिवराज्याभिषेक सोहळा नामशेष करावा' अशी वादग्रस्त प्रतिक्रिया काढत, संभाजी भिडे उर्फ ज्ञानशक्ती शिवप्रतिष्ठान संस्थापक भिडे गुरुजी यांनी पुन्हा एकदा समाजमन दुखावले आहे.

भिडे यांच्या या वक्तव्यावर महाराष्ट्रभर संतापाची लाट उसळली असून, अनेक शिवप्रेमी, इतिहास अभ्यासक आणि समाजातील सर्व स्तरांतून या विधानाचा निषेध करण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर मुंबई उच्च न्यायालयाचे ड. शंकर चव्हाण यांनी ट्विटरवरून आपली तीव्र प्रतिक्रिया नोंदवली आहे. त्यांनी म्हटले आहे की, ६ जूनचा श्रीशिवराज्याभिषेक सोहळा हा लोकोत्सव आहे. भिडे किंवा त्यांच्यासारखे कितीही जन्माला आले, तरी हा सोहळा बंद होणार नाही. ही महाराष्ट्राची अस्मिता आहे आणि यावर कोणीही घाला घालू शकत नाही. चला मावळ्यांनो, लागा तयारीला - चलो किल्ले रायगड ६ जून.

राज्याभिषेक दिन म्हणजे महाराष्ट्राचा अभिमान. छत्रपती शिवाजी महाराजांनी ६ जून १६७४ रोजी रायगडावर राजर्षी परंपरेत राज्याभिषेक करून हिंदवी स्वराज्याची अधिकृत स्थापना केली. हजारो वर्षे अन्याय, शोषण आणि अपमान सहन केलेल्या समाजासाठी हे स्वराज्य नवजीवन होते.

भिडे यांच्या वक्तव्यांमुळे वारंवार वाद निर्माण होतात. ही पहिली वेळ नाही की भिडे गुरुजी यांनी वादग्रस्त विधाने करून महाराष्ट्रात सामाजिक तेढ निर्माण केली आहे. यापूर्वीही त्यांनी महिलांबाबत, संत विचारांबाबत आणि ऐतिहासिक घटनांबाबत गैरसमज पसरवणारी विधाने केली आहेत. अशा वक्तव्यांमुळे समाजात अस्वस्थता निर्माण होते आणि शिवप्रेमींच्या भावना दुखावल्या जातात.

ड. शंकर चव्हाण यांनी आपल्या प्रतिक्रियेत स्पष्ट शब्दांत म्हटले की, समाजाला फोडणारे, महाराष्ट्राच्या अस्मितेवर घाला घालणारे भिडे यांनी तोंडाला लगाम घालावा. छत्रपती शिवाजी महाराज हे संपूर्ण देशाचे दैवत आहेत. अशा व्यक्तींनी स्वार्थासाठी किंवा प्रसिद्धीसाठी वारंवार राजमाता जिजाऊ, छत्रपती शिवाजी महाराज आणि हिंदवी स्वराज्याच्या पवित्र परंपरेचा अपमान करणे, हे महाराष्ट्र खपवून घेणार नाही. त्यांनी सरकारला इशारा दिला की, अशा समाजविघातक वक्तव्यांवर कायदेशीर कारवाई करा, अन्यथा शिवप्रेमींच्या रोषाची जबाबदारी शासनावर राहील.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेक दिनानिमित्त दरवर्षी रायगड किल्ल्यावर लाखो शिवभक्त एकत्र येऊन अभिवादन करतात. या वर्षीही हा सोहळा भव्य दिव्य स्वरूपात साजरा करण्यासाठी हजारो शिवप्रेमी सज्ज झाले आहेत. ड. शंकर चव्हाण यांनी त्यांच्या ट्विटद्वारे 'चलो किल्ले रायगड'चा निर्धार पुन्हा एकदा शिवप्रेमींमध्ये जागवला आहे.

आजच्या पिढीला खरी प्रेरणा देणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याची अपमानास्पद टीका थांबवणे आवश्यक आहे.

महाराष्ट्राचे सामाजिक आणि सांस्कृतिक एकात्मतेसाठी अशा प्रवृत्तींना वेळेत रोखणे हे समाजाच्या हिताचे आहे.

राज्याभिषेक सोहळ्यावर प्रश्नचिन्ह उपस्थित करणारे भिडे गुरुजी आणि अशा प्रकारचा विषारी प्रचार करणाऱ्यांविरुद्ध कठोर भूमिका घेणे ही काळाची गरज आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्याची, महाराष्ट्राच्या अस्मितेची आणि हजारो मावळ्यांच्या स्वाभिमानाची ही लढाई आहे. यामध्ये कुठलाही अपमान सहन केला जाणार नाही, असा ठाम निर्धार शिवप्रेमींनी केला आहे.

# राजेश्वर हिवाळे पाटील यांची उपसरपंच पदी बिनविरोध निवड

**आत्ताच एक्सप्रेस**

**गंगापूर /प्रतिनिधी/ सुभान शहा** / दिनांक २३ मे रोजी गंगापूर तालुक्यातील वाहेगाव ग्रामपंचायत कार्यालय येथे दुपारी १२ वाजता ग्रामपंचायत चे सर्व सदस्य सरपंच व ग्रामसेवक व अधिकारी यांच्या उपस्थितीत बैठक संपन्न झाली .



यावेळी उपस्थितीत सर्वांना मते राजेश्वर हिवाळे यांची उपसरपंच पदी बिनविरोध निवड करण्यात आली असून त्यांना पुढील वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा देण्यात आल्या, तसेच वाहेगाव येथे डि.जे. च्या ताळेवर नाचत गाजत जल्लोष साजरा करण्यात आला. राजेश्वर हिवाळे यांची सर्वत्र कौतुक व चर्चा होत आहे, यावेळी ग्रामपंचायत सदस्य रेणुका भडके, कल्याण हिवाळे, शिवाजी मनाळ, रवींद्र तगरे, चंद्रकला पारखे,प्रमिला चाफेकर,जनाबाई मनाळ, उषाबाई मनाळ, संगिता पारखे, लक्ष्मण पारखे, आंदी ग्रामपंचायत सदस्य व तसेच किशोर गव्हाणे ग्रामविकास निवडणूक अधिकारी, मंडळ अधिकारी गवळी आप्पा, तलाठी साळुंके आप्पा, व ग्रामस्थांनी पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# छत्रपती संभाजीराजे यांचे भव्य स्मारक खुलताबादेत साकारणार-आमदार संजय केणेकर

**आत्ताच एक्सप्रेस**

**खुलताबाद/प्रतिनिधी/** खुलताबाद ही जशी सुफी संतांची भूमी आहे तशीच ती ऐतिहासिक पार्श्वभुमी असलेली आहे,ज्या संभाजी महाराजांना मुघल सम्राट औरंगजेबाने अनन्वित छळ करून मारले,त्या औरंगजेबाचे नामोनिशाण मिटवून खुलताबादेत संभाजी राजे यांचे भव्य दिव्य स्मारक उभारण्यासाठी आपले अविरत प्रयत्न राहणार असून,यामुळे खुलताबादची नवी ओळख निर्माण होईल असे प्रतिपादन विधानपरिषद सदस्य आमदार संजय केणेकर यांनी खुलताबादेत शनिवारी (दि.२४) केले.

खुलताबाद येथील जाज्वल्य दैवत श्री भद्रा मारोती मंदिरास आमदार केणेकर यांनी भेट देवून भद्र हनुमानाचे दर्शन घेवून अभिषेक केला,यानंतर महा आरती करण्यात आली.यावेळी संवाद साधताना आमदार केणेकर म्हणाले, खुलताबाद शहरात होणारी विविध मंदिरासमोर होणारी महाआरती आता ग्रामीण भागातही सुरु करण्यात येईल,त्याद्वारे संघटन मजबुती हा एकच उद्देश असल्याचे स्पष्ट केले.यावेळी त्यांच्या समवेत भा.ज.पा. (पश्चिम) चे जिल्हाध्यक्ष संजय खंबायते, जिल्हा उपाध्यक्ष प्रकाश वाकळे शहराध्यक्ष परसराम बारगळ ज्ञानेश्वर बारगळ सुरेश मरकड माजी उपसभापती दिनेश अंभोरे सतीश दांडेकर राहुल हजारे. अविनाश कुलकर्णी. अल्पसंख्याक तालुका अध्यक्ष मुक्तार पठाण. शेख बशीर. गणेश सावजी सोनू भावसार यांचे सह मोठ्या संख्येने भारतीय जनता पार्टीचे पदाधिकारी व



कार्यकर्ते उपस्थित होते.



# सलग सुट्ट्या अन लग्नसराई मुळे वेरुळ लेणी समोर रहदारीची कोंडी

**आत्ताच एक्सप्रेस**

**खुलताबाद/ प्रतिनिधी/** खुलताबाद खुलताबाद तालुक्यातील जगप्रसिद्ध वेरूळ लेणी येथे-सलग सुट्ट्या अन लग्नाची दाट तिथी यामुळे शनिवारी (ता.२४) तालुक्यातील जगप्रसिद्ध वेरूळ लेणी समोर व बारावे ज्योतिर्लिंग घृष्णेश्वर मंदिरासमोर भाविक,लग्नाला जाणारया वाहनांमुळे एकच गर्दी झाली.

या मार्गावर वाहनांच्या गर्दीमुळे वेरूळ येथे वाहतुकीची कोंडी झाली होती,लेणी समोरील रस्ता अत्यंत अरुंद बनला असून,त्यात बाहेरुन येणारी वाहने सर्रास रस्त्याच्या कडेला लावली जात असल्याने रहदारी ठप्प होण्याचा प्रकार नित्याचाच झाला असून, शनिवारी (दि.२४)भाविक,पर्यटक,लग्नाला जाणारी वाहने सगळीच एकत्र आल्याने चांगलीच वहातूक कोंडी झाली.

# भाजपातर्फे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर त्रिशताब्दी जयंतीनिमित्त राज्यभर विविध कार्यक्रम-विजय चौधरी

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/प्रतिनिधी/** राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर त्रिशताब्दी जयंतीनिमित्त त्यांना वंदन करण्यासाठी भारतीय जनता पार्टीच्या वतीने राज्यभर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. २१ मे पासून भारतीय जनता पार्टीतर्फे राज्यात हे अभियान सुरु झाले असून ३१ मे रोजी त्याची सांगता होणार आहे. अहिल्यादेवींनी ३०० वर्षांपूर्वी दिलेले योगदान, जनहितार्थ केलेली कामे या अभियानातून जनतेपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न भारतीय जनता पार्टी करणार असल्याची माहिती भाजपा प्रदेश सरचिटणीस व अभियानाचे संयोजक विजय चौधरी यांनी शुक्रवारी दिली. भाजपा प्रदेश कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी भाजपा प्रदेश माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन, या अभियानाच्या सह संयोजक वर्षा भोसले, डॉ. स्मिता काळे - बंडगर आदी उपस्थित होते.

वक्तृत्व, निबंध स्पर्धा, प्रदर्शने, नाटिका, युवा व महिला संमेलने, शोभायात्रा यांच्या माध्यमातून अहिल्यादेवींच्या कार्याची ओळख करून देण्यात येईल, असेही श्री. चौधरी यांनी नमूद केले.

यावेळी चौधरी म्हणाले की,




२९ मे रोजी चांदवड येथील रंगमहाल या होळकर वाड्यात होळकरांचे वंशज महाराज श्रीमंत शिवाजीराव होळकर, युवराज श्रीमंत यशवंतराव होळकर, श्रीमंत अमरजित बारगळ, पालकमंत्री गिरीश महाजन आणि आमदार राहुल आहेर यांच्या उपस्थितीत एका भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे. या अभियानात अहिल्यादेवींशी संबंधित ४० हून अधिक ठिकाणी मंदिरे, घाटांची सफाई तसेच महाआरती, शिवस्तोत्र पठण, वेदपठण यासारखे कार्यक्रम होणार आहेत. अहिल्यादेवींच्या कार्याची ओळख करून देणारी १० लाख पत्रके तसेच २५ हजार पुस्तकांचे वितरण करण्यात येणार असल्याचेही त्यांनी नमूद केले. अहिल्यादेवींचे कार्य शेवटच्या व्यक्तीपर्यंत पोहोचविण्याचे ध्येय मनात ठेवून भाजपाच्या वतीने १६ ते १९ मे दरम्यान सर्व संघटनात्मक जिल्ह्यांमध्ये भाजपा पदाधिकारी व कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करण्यासाठी कार्यशाळांचे देखील आयोजन करण्यात आले होते.

# धुळे विश्रामगृहातील १ कोटी ८४ लाखांचे प्रकरण दडपून टाकण्याचे गृह खात्याचे गुप्त आदेश

**आत्ताच एक्सप्रेस**

**धुळे / प्रतिनिधी**/धुळे जिल्ह्याच्या दौऱ्यावर असलेल्या विधीमंडळाच्या अंदाज समितीतील आमदारांना पाच कोटींच्या वाटपासाठी पैसे आणण्यात आल्याचा गंभीर आरोप माजी आमदार अनिल गोटे यांनी केला होता. यानंतर गोटे यांनी ज्या खोलीत पैसे ठेवले होते त्या खोलीला कुलूप लावले होते. पोलिसांनी ती खोली उघडून तपासणी केली असता एक कोटी ८४ लाख रुपये आढळून आले होते. तर ही खोली आमदार अर्जून खोतकर यांचे स्वीय सहाय्यक किशोर पाटील यांच्या नावावर बुक करण्यात आली होती. या प्रकरणाची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गंभीर दखल घेतली. प्रकरणाची सखोल चौकशी करण्यासाठी एसआयटीची स्थापना करण्याचे आदेश त्यांनी दिले. मात्र, मुख्यमंत्र्यांनी चौकशी समिती नेमण्याची घोषणा केल्यानंतर अनिल गोटे यांनी समितीवर अविश्वास व्यक्त केला होता. आता गोटे यांनी आता पुन्हा एकदा सनसनाटी आरोप केल्याने राजकीय वर्तुळात एकच खळबळ उडाली आहे.

अनिल गोटेंचा सनसनाटी आरोप

धुळे शहरातील शासकीय गुलमोहर विश्रामगृहातील खोली क्रमांक १०२ मध्ये सापडलेल्या रोकड रकमेचे प्रकरण दडपून टाकण्याच्या उद्योगाकडे पोलिसांची वेगाने वाटचाल चालू झाली असून आतापर्यंत गुन्हा रजिस्टर न करता तपासाच्या नाटकाचा पहिला अंक पूर्ण झाला आहे. सदर प्रकरण दडपून टाकण्याची गृह खात्याचे गुप्त आदेश असल्याचा आरोप माजी आमदार अनिल गोटे यांनी केला असून तृतीय व चतुर्थ श्रेणीच्या कर्मचाऱ्यांना बळीचा बकरा करण्याचे षडयंत्र रचले जात असल्याचे देखील त्यांनी म्हटले आहे. याप्रकरणी तृतीय व चतुर्थ श्रेणीच्या कर्मचाऱ्यांवर गुन्हा दाखल केल्यास आपण आमरण उपोषण आंदोलन करू, असा इशारा देखील अनिल गोटे यांनी दिला आहे. त्यामुळे आता या प्रकरणात पुढे नेमकं काय होणार? हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

## संक्षिप्त



अंबड तालूका दुष्काळ ग्रस्त अनुदान घोटाळा प्रकरणी दोषी तलाठी हे अपहार केलेले लाखो रुपये परत भरत आहेत. यावर सिद्ध होते कीं आपहार केला. गरीब आणि गरजवंत शेतकरी यांचे हक्काचे पैसे तलाठी आणि संबंधित यंत्रनेने खाल्ले,अशा भ्रष्टाचारी अधिकऱ्यांची चोकशी करून त्यांची अवैध्य रीतीने कमवलेली जंगम मालमत्ता जिल्हा अधिकारी पांचाळ साहेब यांनी ताब्यात घ्यावी. तसेच त्यांना सेवेतून बडतर्फ करावेत.

# वैभवशाली इतिहासाची साक्ष देणाऱ्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर स्मारकासाठी राज्यशासन सर्वतोपरी सहकार्य करेल- वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे यांची ग्वाही

**आत्ताच एक्सप्रेस**
**मुंबई प्रतिनिधी/** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंती वर्षानिमित्त महाराष्ट्रात विविध सांस्कृतिक आणि सामाजिक उपक्रमांचे आयोजन केले जात आहे. याच पार्श्वभूमीवर, जा-लना शहरात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे स्मारक उभारण्यात येत आहे .या स्मारकामुळे जालना शहर पर्यटन आणि सांस्कृतिक केंद्र म्हणूनही ओळखले जाईल, या स्मारकासाठी शासन स्तरा-वर सर्वतोपरी सहकार्य केले जाईल.

अशी ग्वाही वस्त्रोद्य-ोग मंत्री संजय सावकारे यांनी दिली.

जालन शहरातील अंबड चौफुली परिसरात उभारण्यात येत असलेल्या 'हिंदूधर्मरक्षिका महार-ाणी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर स्मारकाची वस्त्रोद्य-ोग मंत्री संजय सावकारे यांनी पाहणी केली. या प्रसंगी आमदार नारायण कुचे, भास्कर आबा दानवे, बद्रीनाथ पठाडे, भगवान मात्रे, स्मारक समितीचे अध्यक्ष कपील दहेकर, सचिव शांतीलाल बनसोडे, कोषाध्यक्ष बालास-ाहेब अबुज, सदस्य तुकाराम कोल्हे, एस. एस. दहेकर, प्रा. गणेश गुंजाळ, साहित्यिक पंडित तळेगावकर, कुरधने सर, काळे साहेब यांच्यासह विविध समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मंत्री संजय सावकारे म्हणाले, जालना शहराचा सांस्कृतिक आणि ऐतिहासिक वारसा समृद्ध करणारे २४ फूट उंचीचे हे स्मारक देशा-तील सर्वात उंच अहिल्यादेवी होळकर स्मारक ठरणार असून वैभवशाली इतिहासाची साक्ष देणारे आहे या स्मारकाच्या पार्श्वभूमीला ऐतिहासिक महेश्वर किल्ला आणि इंदूर राजवाड्याच्या संकल्पनेचा मिलाफ साधणारी २८ फूट उंच आणि ५६ फूट रुंद दगडी भिंत उभारली जाणार आहे.

ही भिंत स्मारकाचे विशेष आकर्षण ठरणार आहे. या भव्य प्रकल्पासाठी आणि सुशोभीकरणासाठी शासन सकारात्मक असून सर्वतोपरी सहकार्य करेल.

स्मारक समितीचे अध्यक्ष कपील दहेकर म्हणाले,हे स्मारक अहिल्यादेवींच्या कार्याचा आणि त्यांच्या समाजसुधारणेच्या विचारांचा गौरव आहे. यामुळे जालना शहराचे सांस्कृतिक वैभव वाढेल आणि भावी पिढ्यांना प्रेरणा मिळेल.

दरम्यान जालना जिल्ह्यात तिरंगा यात्रा समारोप आणि माजी सैनिकांचा सत्कार कार्यक्रमवस्त्रोद्योगमंत्री संजय सावकारे यांच्या उपस्थितीत पार पडला.

# संभाजी भिडे आणि सदावर्तेचा बोलवता धनी तर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**आत्ताच एक्सप्रेस**
**जालना (प्रतिनिधी)** संभाजी भिडे ऊर्फ मनोहर कुलकर्णी आणि गुणरत्न सदा-वर्ते यांचा बोलवता, कर्ता, करविता धनी तर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसच असून साक्षात मुघल सम्राट औरंगजेबाला शक्य झाले नाही ते घडवण्याचा हा बालिश प्रयत्न केला जात असल्याचा गंभीर आरोप करत मराठा, धनगर, बहुजन वाद वाढावा ही देवेंद्र फडणवीस प्रणीत चाल असून समस्त बहुजन समाजाने सावध राहावे असे आवाहन शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे सचिव डॉ. संजय लाखेपाटील यांनी केले आहे.

या संदर्भात बोलतांना डॉ. संजय लाखे पाटील म्हणाले की, या युगी सर्व पृथ्वीवर म्लेंच्छ पातशाह...मऱ्हाटा पातशाह एवढा छत्रपती जाहला, ही गोष्ट सामान्य झाली नाही.. असे ज्याचे तत्कालीन सर्वदेशी इतिहासकारांनी वर्णन केले आणि ज्या घटनेने मृतप्राय तमाम हिंदू समाजात अक्षरशः नवचैतन्य संचारले अशी शेकडो वर्षातून घडलेलूली शिवराज्याभिषेक ही एकमेवाद्वितीय ऐतिहासिक जिवंत घटना असून ०६ जून हा नेमानेच साजरा होणारा भारतवर्षातील एक सर्वोच्च आनंद सोहळा असून त्या पासून करोडो लोक, पिढ्यान--पिढ्या लढावू वृत्ती, अचूक नियोजन, स्वातंत्र्य, स्वराज्य, रयतेचे राज्य आणि स्वाभिमान यांची प्रेरणा घे-तात आणि हा सोहळा तिथी, तारीख अश्या वादात न पडता दररोज ही साजरा करण्यास व हृदयाच्या देव्हाऱ्यात पुजण्यासाठी सज्ज असतात. तोच राज्यभिषेक सोहळा सहेतुक तिथी आणि तारखेच्या वादात ओढून आपल्या हुकूमी आणि पाळीव गुलाम अनुयायांना हाताशी धरून महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे कुहेतुपुर्वक राज्यात मराठा धनगर बहुजन हा जातिय - धार्मिक वाद तेवत ठेवण्यासाठी प्रयत्नशिल आहेत आणि म्हणूनच युगप्रवर्तक युगपुरूष शिवशककर्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ऐतिहासिक शिवराज्याभिषेकचा तारीख आणि तिथी असा वाद उकरून काढण्याचे षडयंत्र संभाजी भिडे मार्फत आखून आणि त्यात पुन्हा अनैतिहासिक वाघ्या कुत्र्याचा तडका द्यायला लावून जातिय धार्मिक वाद निर्माण करून विशेषतः महाराष्ट्रातील कायदा आणि सुव्यवस्था बिघडवण्याचे षडयंत्र रचत असल्याचा अतिशय गंभीर आरोप शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे सचिव डॉ. संजय लाखेपाटील यांनी केला आहे.

मुघल बादशहा औरंगझेबाचा सरदार मिर्झा राजे जयसिंग यांचा विजय व्हावा म्हणून होमहवन यज्ञ करणाऱ्यांच्या जातकुळीचा वारस शिवद्रोही संभाजी भिडेचे, शिवराज्याभिषेक सोहळा कायमचा नामशेष करा हे गुन्हेगारी स्वरूपाचे वक्तव्य पाहून गृहमंत्री असलेल्या देवेंद्र फडणवीस यांना यात काहीच दखलपात्र वाटत नाही का? साक्षात छत्रपती शिवाजी महाराज आणि पवित्र आणि पिढ्यानपिढ्या प्रेरणादायी शिवराज्याभिषेक सोहळा कायमचा नामशेष करा असे म्हणून संभाजी भिडे ऊर्फ मनोहर कुलकण याने अतिशय गंभीर गुन्हा केला गेला आहे असे फडणवीस यांना गृहमंत्री म्हणून वाटत नाही का? शिवराज्याभिषेक कायमचा नामशेष करा या भिडे यांच्या नालायकी वक्तव्यामुळे शिवभक्त म्हणून श्री देवेंद्र फडणवीस यांच्या स्वतःच्या भाव-नेला ठेच पोहोचली नाही का? मग स्वतः फडणवीस आणि त्यांचे गृहखाते इतकं बेसुध का आहे? की या गुन्हेगारी कृत्याची स्वतः होऊन दखलच घेत नाही? भिडे विर-ोधात कुणीतरी तक्रार करावी आणि आपण भिडे च्या डोक्यावर हात ठेवून अश्या विकृत प्रवृत्तीचे समर्थक गोंजारावेत यांची फडणवीस वाट पाहात आहेत का? असा रोकडा सवाल डॉ. संजय लाखेपाटील यांनी विचारला आहे. गेल्या काही दिवसांपूव पिसाळलेले कुत्रे चावल्यानंतर पहिल्यांदाच सार्वजनिक ठिकाणी प्रगट होऊन संभाजी भिडे ऊर्फ मनोहर कुलकर्णी याने काल पिसाळलेल्या कुत्र्यागतच ठरवून दिलेली वक्तव्य भुंकली आहेत आणि संपूर्ण महाराष्ट्र आणि देशातील तमाम सर्वधमय शिवप्रेमी दरवष प्रमाणे ६ जूनच्या शिवछत्रपती राज्याभिषेक सोहळ्याची तयारीत मग्न असतांनाच

(आणि काही तिथी प्रमाणे आजही साजरा करतातच) त्याने पिसाळल्यागत वक्तव्ये करून सुसंस्कृत शिवप्रेमींच्या मनाचे आणि भावनेचे लचके तोडण्याचा आणि त्यांना भडकावण्याचा अश्लाघ्य प्रयत्न केला आहे आणि ६ जूनचा शिवछत्रपती राज्याभिषेक कायमचा नष्ट झाला पाहिजे; कायमस्वरूपी बंद केला पाहिजे.! अशी अतिशय भडकावू वक्तव्ये केली आहेत आणि आज पुढील क्रम ठरवून दिल्यागत गुणरत्न सदावर्ते आदी त्यात सामिल झालेले दिसून येत आहेत! संभाजी भिडे ऊर्फ मनोहर कुलकर्णी यांच्या काल आणि मागच्या काही दिवसांतील भेटी गाठी बघता आणि या संपूर्ण घटनाक्रमाची क्रोनोलॉजी समजून घेता भिडे व सदावर्ते आदी जे पिसाळलेले धाडस करताहेत त्यामागे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची फुस आहे. हे लक्षात येते! आणि म्हणूनच गृहमंत्री असलेले देवेंद्र फडणवीस किंवा त्यांचे हुकमी गृहखाते गप्पगार आहे. यामागे एकीकडे शिवछत्रपती राज्याभिषेक सोहळ्याला तिथी, तारखेचा वाद निर्माण करायचा तर दुसरीकडे त्यास अनैतिहासिक वाघ्या कुत्र्याचा तडका देऊन स्वतः जातिवंत इतिहासकार असल्यागत तो काढूच नका असे असंदभय म्हणत येणाऱ्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त होणाऱ्या कार्यक्रमाच्या पार्श्वभूमीवर धनगर मराठा बहुजन हा सामाजिक वाद वाढवायचा अशी ही कुटील चाल असून त्या पाठीमागे अनाजीपंत फडणवीस यांच्या शिवाय दुसरा कुठलाही विचित्र मेंदू असूच शकत नाही कारण हे दोघेही फडणवीस यांची पाळीव असंस्कृत जनावरे आहेत हे उभ्या महाराष्ट्राला अतिशय चांगले अवगत आहे.

आणि येत्या काही दिवसांत संभाजी भिडे आदींच्या वक्तव्याने राज्यातील कायदा आणि सुव्यवस्था परिस्थिती बिघडली तर त्याची जबाबदारी ही निश्चितच फडणवीस आणि गृहखात्याची असेल हे नक्की. कदाचित सुदैवाने या संभाजी भिडे ऊर्फ मनो-हर कुलकर्णी यांच्या पाठीमागे गृहमंत्री असलेल्या श्री देवेंद्र फडणवीस यांचा हात नसेलच त्यांची फुस नसेल आणि नाही तर, साक्षात शिवछत्रपती राज्याभिषेक सो-हळा कायमस्वरूपी नामशेष करावा.! असे जाहीर सामाजिक धार्मिक स्फोटक व्यक्तव्य करणारा संभाजी भिडे ऊर्फ मनोहर कुलकर्णी आणि हा वाद वाढवणारा आणि राज्यातील शिवप्रेमीच्या भावनेशी खेळणारे गुणरत्न सदावर्ते आदीवर राज्यसरकारने व गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वतः होऊन कठोरात कठोर गुन्हे दाखल करण्याचे आदेश तातडीने देऊन तसे गुन्हे दाखल करावेत आणि आपण सराईत शिवद्रोह्यांच्या बाजूने नाही हे कृतीतून सिद्ध करावे असेही आवाहन डॉ. संजय लाखेपाटील यांनी केले आहे.

येत्या ३१ मे रोजीच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जन्म जयंती कार्यक्रमाला गालबोट लागावे आणि त्यातून मराठा धनगर बहुजन हा वाद वाढावा या अतिशय कुटील खेळतील ही एक देवेंद्र फडणवीस प्रणीत चाल आहे. हे ओळखून समस्त बहुजन समाजाने सावध राहावे असे आवाहन ही डॉ. संजय लाखेपाटील यांनी केले आहे.

# थायरॉईड निदान अभियान वर्षभर चालणाऱ्या अभियानात १० हजार चाचण्यांचे उद्दिष्ट-डॉ. राजेश सेठीया





**आत्ताच एक्सप्रेस**
**जालना/प्रतिनिधी/** सौ. जमुनाबाई शिवरतनजी बगडिया चॅरिटेबल ट्रस्टतर्फे मोफत थायराइड निदान अभियान राबविण्यात येणार असून, प्रकल्प प्रमुख रुबी हॉस्पिटलचे संचालक डॉ. राजेश सेठीया यांच्या मार्गदर्शनाखाली वर्षभरात १० हजार थायरॉईड चाचण्यांचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असल्याची माहिती ट्रस्टचे अध्यक्ष पन्नालाल बगडिया यांनी दिली.

२५ मे हा जागतिक थायरॉईड दिन म्हणून साजरा करण्यात येतो. या दिना-चे औचित्य साधून या अभियानाची रूपरेषा विषद करताना श्री. बगडिया म्हणाले की, १ जुलै २०२५ डॉक्टर डे पासून ३० जून २०२६ असे वर्षभर थायरॉईड निदान अभियान राबविले जाण-ार असून, या अभियानासाठी रोटरी क्लब ऑफ जालना रेनबोच्या नूतन अध्यक्ष डॉ. प्रतिभा श्रीपत, सचिव पंकज लड्ढा, इंद्रायणी पॅथॉलॉजीचे डॉ. जितेंद्र बारगाजे, डॉ. संदीप कुलकर्णी यांचे सहकार्य लाभणार आहे.

या आजाराचे वेळीच निदान होणे गरजेचे आहे; अन्यथा अनेक संभाव्य धोके असतात. शासन आणि विविध सेवाभावी संस्था अनेक आजाराबाबत निदान मोहीम, अभियान राबवितात. मात्र, थायरॉईड निदान दुर्लक्षित आहे. सर्वसामान्य जनता अद्या-पही थायरॉईडबाबत अनभिज्ञ आहे. विशेष करून या चाचण्या महागड्या असल्याने, सर्वसामान्य जनता स्वतःहून निदान करण्यासाठी पुढाकार घेत नाहीत.

वेळेवर निदान होऊन उपचाराने पुढील संभाव्य गुंतागुंतीचे आजार टाळण्याच्या उद्देशाने आम्ही विशेष अभियान राबवणार आहोत. यापूर्वी रोटरी इंटरनॅशनलचे डायबिटीज डायरेक्टर डॉ. राजेश सेठिया यांच्या मार्गदर्शनात संपूर्ण प्रांतात राबविण्यात आलेल्या अब की बार एक लाख पार या मोफत मधुमेह निदान अभियानाची यशस्वि-ता पाहता, प्रकल्प प्रमुख डॉ. सेठीया यांच्या संकल्पनेतून वर्षभर मोफत थायरॉईड निदान अभियान राबविण्याचा निर्णय ट्रस्टने घेतल्याची माहिती पन्नालाल बगडिया यांनी दिली. या अभियानासाठी ग्रामीण आणि शहरी भागात जिल्हाभर जनजागृती केली जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

या अभियानाचे प्रकल्प प्रमुख डॉ. सेठीया म्हणाले की, सामाजिक दायित्वातून सौ. जमुनाबाई शिवरतनजी बगडिया चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष पन्नालाल बागडिया यांचे शैक्षणिक, आरोग्य, सामाजिक उपक्रमासाठी नेहमीच योगदान लाभत आलेले आहे.

रोटरीच्या प्रांत स्तरावरील अब की बार एक लाख पार या मोफत मधुमेह निदान अभियानात ३० हजार मधुमेह तप-ासणी किट्सचे योगदान सौ. जमुनाबाई शिवरतनजी बगडिया ट्रस्टचे राहिलेले आहे. आता ट्रस्टमार्फत राबविले जाणारे मोफत थायरॉईड निदान अभियान अत्यंत स्तुत्य ठरणार असून, असे सांगून ते म्हणाले की, थायरॉईड ग्रंथीच्या कार्यातील बिघाडामुळे वजन वाढणे किंवा घटणे, थकवा, केस गळणे, मासिक पाळीतील बदल, त्वचा कोरडी किंवा जाड होणे, मानसिक अस्वस्थता, वंध्यत्व, हृदयविकार, हाडांचे आजार अशी अनेक लक्षणे दिसून येतात. वेळीच निदान न झाल्यास थायरॉईड विकार गुंतागुंतीचे स्वरूप धारण करतो.

विशेषतः महिलांमध्ये त्याचे प्रमाण जास्त असून, गरोदरपणात आई व बाळ दोघांवरही त्याचा परिणाम होऊ शकतो. आयोडीनची कमतरता, औषधांचे दुष्परिणाम, व्यायामाचा अभाव आणि आधुनिक जीवनशैली ही यामागील प्रमुख कारणे आहेत. थायरॉईड आजाराचे वेळीच निदान झाले नाही तर भविष्यात होणाऱ्या गुंतागुंती टाळणे कठीण होते.

त्यामुळे मोफत चाचण्या उपलब्ध करून देणे ही काळाची गरज आहे. जर तुम्हाला ही लक्षणे दिसत असतील तर या अभियानात मोफत थायरॉईड तपासणी करून घ्यावी, असे आवाहन डॉ. सेठिया यांनी केले आहे.

थायरॉईड चाचण्या सामान्यांसाठी खर्चिक असतात, म्हणून त्याकडे दुर्लक्ष होते. या पार्श्वभूमीवर, गरजू आणि अनभिज्ञ लोकांसाठी हे अभियान जीवनदायिनी ठरणार आहे. समाजासाठी काहीतरी चांगले करावे, याच भावनेतून आम्ही हा उपक्रम सुरू करत आहोत. आरोग्य, शिक्षण आणि समाजसेवा यामध्ये सौ. जमुनाबाई शिवरतनजी बगडिया चॅरिटेबल ट्रस्टचा सहभाग यापुढेही असाच सुरू राहील.

**-पन्नालाल बगडिया-**
**अध्यक्ष, सौ. जमुनाबाई शिवरतनजी बगडिया चॅरिटेबल ट्रस्ट**

थायरॉईड विकाराचा सर्वाधिक फटका महिलांना बसतो. सध्याच्या आकडेवारीनुसार भारतात थायरॉईडचे प्रमाण महिलांमध्ये ८९ टक्के असून पुरुषांमध्ये केवळ ११ टक्के आहे. शासकीय आकडेवारीनुसार भारतात ४ कोटी २० लाख थायरॉईडचे रुग्ण आहेत. प्रत्यक्षात या आजाराबाबत अनभिज्ञ असलेले व निदान न केलेले असे १० ते १५ कोटी लोक आहेत. त्यांचा शोध घेणे म्हणजेच निदान होणे गरजेचे आहे. त्यादृष्टीने देश पातळीवर शासन स्तरावरून विशेष मोहीम राबवली जाणे गरजेचे आहे. विशेषतः महिलांमध्ये वंध्यत्वासारख्या गंभीर समस्या ह्या थायरॉईड ग्रंथीच्या असंतुलनामुळेच उद्भवतात. या विकारामागे आयोडीनची कमतरता हे मुख्य कारण आहे. अद्यापही अनेक कुटुंबांमध्ये खडे मीठ वापरले जाते, ज्यामध्ये आयोडीनचे प्रमाण अत्यंत कमी असते. त्यामुळे खडे मीठ टाळून आयोडीनयुक्त मीठाचा वापर करणे ही काळाची गरज आहे. शिवाय आधुनिक जीवनशैलीतील व्यायामाचा अभाव, फास्ट फूडचे अतिसेवन आणि असंतुलित आहार हे देखील थायरॉईड वाढण्याची प्रमुख कारणे आहेत. त्यामुळे शरीरातील बदलांबाबत सजग राहणे, वेळेवर निदान करून घेणे आणि निरोगी जीवनशैली अंगीकारणे आवश्यक आहे.

**-डॉ. राजेश सेठीया**
**अभियान प्रकल्प प्रमुख**

# जालना शहरात हिरकणी महोत्सवाचे आयोजन; महिलांसाठी होम मिनिस्टर कार्यक्रमासह विविध भरगच्च कार्यक्रमाची मेजवानी





**आत्ताच एक्सप्रेस**
**जालना प्रतिनिधी**/जा-लना येथील उज्वल बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या वतीने दि. २६ मे २०२५ रोजी सकाळी ११ वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृह, टाऊन हॉल, जुना जालना येथे महिलांसाठी हिरकणी महोत्सव आयोजित करण्यात आला असून या महोत्सवात महिलांच्या आवडीचा होम मिनिस्टर कार्यक्रम होणार आहे. तसेच महिलांसाठी विविध योजना आणि माहितीचे स्टॉल देखील या ठिकाणी राहणार आहेत. त्यामुळे या कार्यक्रमाला सर्व महिलांनी उपस्थित रहावे असे संस्थेच्या अध्यक्षा सौ. करुणा अच्युत मोरे यांनी केले आहे.

या महोत्सवाचे उद्घाटन जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांच्या हस्ते करण्यात येणार असून कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून जालना समाजकार्य महाविद्यालयाचे प्रचार्य डॉ. राजकुमार म्हस्के यांची उप-स्थिती राहणार आहे. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुने म्हणून पोलीस अधिक्षक आयुष नोपाणी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी शिरीष बनसोडे, जालना शहर महानगरपालिकेचे आयुक्त संतोष खांडेकर, गटविकास अधिकारी संदीप पवार, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. राजेंद्र पाटील यांची उपस्थिती राहणार आहे.

उज्वल बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या वतीने संस्थेच्या ५ व्या वर्धापण दिनानिमित्त हिरकणी महोत्स-वाचे आयोजन करण्यात आले आहे. दरम्यान महिला सक्षमीकरण अभिया अंतर्गत संस्थेच्या वती-ने सुरु करण्यात आलेल्या हिरकणी सुरक्षा अभियानाची सुरुवात देखील हिरकणी महोत्सवात होणार आहे. हिरकणी सुरक्षा अभियान अंतर्गत १९ ते ३५ वयोगटातील मुली आणि महिलांची मोफत ड्रायव्हिंग प्रशिक्षण आणि स्वसंरक्षण प्रशिक्षणासाठी निवड करण्यात येणार आहे. दरम्यान महिलांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबीर ठेवण्यात आले आहे. महिला आणि बालकांसाठी असलेल्या विविध योजनांची माहिती देणारे स्टॉल आणि अर्ज कार्यक्रमाच्या स्थळी उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

महिलांच्या आवडीचा आणि पसंतीचा होम मिनिस्टर कार्यक्रम देखील आयोजित केला असून त्यात महिलांना पैठणी, चांदीचं नाणं, रोख रक्कम जिंकता येणार आहे. यावेळी राज्यभरातील विविध क्षेत्रात काम करणार्या कर्तबगार महिलांचा हिरकणी पुरस्काराने गुणगौरव होणार आहे. कार्यक्रमासाठी आलेल्या पहिल्या २०० महिलामधून ३ भाग्यवान विजेत्या महिलांना पैठणी मिळणार आहे.

कार्यक्रमाचे खास आकर्षण झी- टॉकीज, झी-मराठी, कलर्स मराठी, सोनी मराठी अशा विविध वाहीन्यावर प्रसिध्द असलेले शाहीर रामानंद उगले यांचा महिलांसाठीचा भव्य सांस्कृतीक कार्यक्रम देखील होणार आहे. यामध्ये भारुड, गवळण, पोवाडा, लोकगीताचे सादरीकरण होणार असून सिंगापूर रिर्टन लावणी सम्राज्ञी स्नेहा दुधाळ यांचा परफॉर्मंस देखील होणार आहे.

**जगातील पहिल्या सर्प मैत्रिणीची उपस्थिती**

राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त तसेच जगातील पहिल्या सर्प मैत्रीण आणि सर्प रक्षक असलेल्या वनिता बोराडे यांचीही या कार्यक्रमाला उपस्थिती राहणार असून त्यांच्या माध्यमातून महिलांना मार्गदर्शन होणार आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक सुग्रीव सोपानराव मुंढे यांनी निरंकारजी प्रिंट ॲण्ड पब्लिकेशन, पी-३०/०/२,गुलमोहर कॉलनी,एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र), येथे छापून पी-३०/०/२, गुलमोहर कॉलनी, एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
मुख्यकार्यालय-०२४०-२४७४८१३, संपादक-सुग्रीव सोपानराव मुंढे मो.९४२१२८१०७८ , RNI.No.MAH/MAR2011/39247
The Printer, Owner & Publisher **Sugriv Sopanrao Mundhe** Print at Nirankarji Print & Publication, P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003 (M.H.) Published at P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003. (**Editor - Sugriv Sopanrao Mundhe**) Office Ph. : 0240-2474813